नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०८/०७/२०२६ (मंगळवार )

# झिरो फॅटॅलिटी डिस्ट्रिक्ट ( ZFD) कार्यक्रमांतर्गत नागपूर ग्रामीण येथे रेंजनिहाय पहिल्या प्रशिक्षण कार्यशाळा यशस्वीरित्या संपन्न

मा. श्री. सदानंद दाते, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांच्या निर्देशानुसार तसेच मा.श्री प्रविण सांळुखे, अपर पोलीस महासंचालक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली, मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांच्या नेतृत्वात **Save LIFE Foundation** यांच्या सहकार्याने ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली. सदर कार्यशाळेस नागपूर परिक्षेत्रातील नागपूर ग्रामीण, भंडारा, वर्धा व चंद्रपूर जिल्ह्यांतील अधिकारी व अंमलदार तसेच गडचिरोली परिक्षेत्रातील गडचिरोली व गोंदिया जिल्ह्यांतील अधिकारी व अंमलदार आणि नागपूर शहर पोलीस आयुक्तालयातील अधिकारी व अंमलदार तसेच महामार्ग सुरक्षा पथकचे अधिकारी व अंमलदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.सदर कार्यशाळेचे उद्घाटन सदर मा.श्री विश्वास नागरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपुर शहर यांच्या हस्ते झाले असुन सदर कार्यक्रमाचे समारोप मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांच्या हस्ते झाले आहे.

**ZFD** हा उपक्रम मा. ना. श्री. देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य तसेच मा. केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री श्री. नितीन गडकरी यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच मा. पालकमंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निरीक्षणाखाली नागपुर ग्रामीण जिल्हयात प्रभावीपणे राबविण्यात येत आहे प्रभावी अंमलबजावणी करून रस्ते अपघातांमधील मृत्यू व गंभीर अपघात कमी करण्यामध्ये नागपूर ग्रामीण पोलीस दलाने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. सेव्हलाइफ फाउंडेशनच्या तांत्रिक सहकार्याने राबविण्यात आलेल्या विविध

उपाययोजनांमुळे नागपूर ग्रामीण जिल्हयात रस्ते अपघातांमध्ये लक्षणीय घट नोंदविण्यात आली असून, राज्यातील अपघात कमी करण्यात सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या पहिल्या पाच जिल्ह्यांमध्ये नागपूर ग्रामीणने सातत्याने स्थान मिळविले आहे.

हा उपक्रम संपुर्ण राज्यात राबविण्यात येणार असुन रेंजनिहाय पहिल्या प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन नागपूर ग्रामीण जिल्ह्यात करण्यात आले होते. **Zero Fatality District** कार्यक्रमाची उद्दिष्टे, रस्ता अपघातांमधील मृत्यू कमी करण्यासाठी प्रभावी उपाययोजना, **Critical Corridor** व्यवस्थापन, अपघात विश्लेषण, विविध विभागांतील समन्वय, आपत्कालीन प्रतिसाद व्यवस्था आणि रस्ता सुरक्षेबाबत करावयाच्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत सेव्हलाइफ फाउंडेशनचे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री पियुष तिवारी आणि त्याच्या टिम ने सविस्तर मार्गदर्शन केले.

कार्यशाळेत उपस्थित असलेल्या अधिकारी आणि अंमलदारांना तसेच **Critical Corridor** पथकांना **ZFD** कार्यक्रमाच्या वैज्ञानिक, डेटा—आधारित आणि परिणामकारक अंमलबजावणीबाबत सविस्तर प्रशिक्षण देण्यात आले. नागपूर ग्रामीण जिल्हयाने राबविलेल्या यशस्वी उपक्रमांचा अनुभव, सर्वोत्तम कार्यपद्धती (**Best Practices**), अपघात विश्लेषण, ब्लॅक स्पॉट सुधारणा, अभियांत्रिकी उपाययोजना, प्रभावी अंमलबजावणी आणि आंतरविभागीय समन्वयाची माहिती या प्रशिक्षणाद्वारे सहभागी अधिकाऱ्यांना देण्यात आली. या कार्यशाळेमुळे रस्ता सुरक्षा अधिक बळकट होण्यास, अपघातांमधील मृत्यूचे प्रमाण कमी करण्यास तसेच **Zero Fatality District** कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांचे ज्ञान व कौशल्य अधिक सक्षम होण्यास मदत होणार आहे.

यावेळी मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण म्हणाले झिरो फॅटॅलिटी डिस्ट्रिक्ट (**ZFD**) कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आजचे प्रशिक्षण महत्त्वपूर्ण ठरणार आहे. क्रिटिकल कॉरिडॉर टीम्सना आवश्यक तांत्रिक कौशल्य प्रदान करण्यासाठी श्री. पियुष तिवारी आणि सेव्हलाइफ फाउंडेशन यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचे आभार व्यक्त करतो. तसेच हे प्रशिक्षण यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतलेल्या नागपूर ग्रामीण पोलीस दलातील सर्व अधिकारी व अंमलदारांचेही अभिनंदन करतो. या

संयुक्त प्रयत्नांमुळे नागपूर ग्रामीणमधील रस्ते अधिक सुरक्षित होतील, असा मला विश्वास आहे. तसेच सेव्हलाइफ फाउंडेशनचे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. पियुष तिवारी म्हणाले, महाराष्ट्रातील सर्व ४५ पोलीस युनिट्समध्ये **ZFD** कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी रेंजनिहाय प्रशिक्षण महत्त्वाचे आहे. या प्रशिक्षण मालिकेतील पहिल्या कार्यशाळेचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल मा. वरिष्ठ पोलीस अधीक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार तसेच नागपूर ग्रामीण पोलीस दलाचे अभिनंदन. रस्ते अपघातांमधील जीवितहानी कमी करण्यासाठी महाराष्ट्र पोलिसांना आवश्यक तांत्रिक सहकार्य व प्रशिक्षण देण्यासाठी सेव्हलाइफ फाउंडेशन कटिबद्ध आहे.

सदर कार्यक्रमाला मा.श्री विश्वास नागरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपुर शहर, मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण, मा. श्री. लोहीत मतानी, पोलीस अधीक्षक, महामार्ग सुरक्षा पथक ,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, सेव्हलाइफ फाउंडेशनचे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री पियुष तिवारी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.



ɣ




Road Safety Profile



# दुकान फोडीचा गुन्हा उघड,
# रोख रक्कमेसह एकुण १३ हजार रूपयाचा मुद्देमाल जप्त,
# २ सराईत आरोपी निष्पन्न, उमरेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन उमरेड :—** दिनांक ०२/०७/२०२६ रोजी फिर्यादी अक्षय सुधाकर खानोरकर यांनी पोलीस स्टेशन उमरेड येथे तक्रार दिली की, दिनांक ३०/०६/२०२६ चे २०/३० वा. ते दिनांक ०२/०७/२०२६ रोजी चे ११/०० वा. दरम्यान कोणीतरी अज्ञात चोरांनी फिर्यादीच्या अक्षय फॅशन ज्वेलरी दुकाणाचे शटर चा ताला तोडुन आत प्रवेश केला. कांउटर वरील नगदी ३५,०००/—रुपये, एक सिलेंडर, डि.व्हि.आर. बॉक्स, चांदिच्या पुजेची थाली, व काही ईमिटेशन ज्वेलरी चोरी करुन घेवुन गेले. अशा रीपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे अप. क्र. ६७८/२०२६ कलम ३३१ (३), ३३१ (४), ३०५ (अ) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण, श्री. मयंक माधव, सहायक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, उमरेड विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन उमरेड येथील तपास पथकाने तांत्रिक विश्लेषण, तसेच गोपनीय माहितीच्या आधारे तपास करून सदर गुन्हयातील आरोपी **क्रं १) आम्रपाल उर्फ हनुमान ब्रम्हानंद पाटील, वय ३४ वर्ष याला दिनांक ०६/०७/२०२६ रोजी नागपूर शहर येथुन ताब्यात घेतले.** नमुद आरोपी यांच्याकडे कौशल्यपुर्ण विचारपुस केली असता त्याने पोलीस स्टेशन उमरेड परिसरात सदरचा गुन्हा हा त्याचा साथीदार **आरोपी क्र. २ अक्षय दिलीप भैसारे, रा. नागपूर** याच्या सह केल्याची माहीती दिली.

**पोलीसांनी पंचासमक्ष १) नगदी २,०००/—रुपये (२) एक इंडीयन कंपनिचे सिलेंडर किंमती १,०००/—रुपये, (३) एक मुर्ती किंमत ी १०,०००/— रुपये असा एकुण १३,०००/— रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपी क्र. १) याला अटक करण्यात आली आहे. दोन्ही आरोपी हे सराईत आरोपी असुन त्यांच्या विरुध्द, चोरी, घरफोडी, जबरी चोरी, जिवाणे मारण्याचा प्रयत्न, दरोड्याचा प्रयत्न असे अनेक गंभीर गुन्हे दाखल आहे. आरोपी क्रं २ अक्षय भैसारे हा आंतरराज्यीय घरफोड्या करणारा आरोपी असुन त्याच्या विरुध्द महाराष्ट्रा व्यतिरीक्त छत्तीसगढ़ येथे सुध्दा घरफोडी सबंधाने गुन्हे**

**दाखल असुन तो सध्या भंडारा जिल्हयात कारागृहात दाखल असल्याची माहीती प्राप्त झाली आहे.**




## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद वाहनासह ३० लाख ४५ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त भिवापूर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन भिवापूर** :— दिनांक ०७/०७/२०२६ रोजी भिवापूर पोलीस पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतूक केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी कारगाव रेल्वे

क्रॉसिंग जवळ नाकाबंदी केली असता १२ चाकी टिप्पर क्रमांक एम एच—४९/बी झेड—९१६८ मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. **टिप्पर चालक नामे १) अभय शिवराम गोंडाणे, वय २८ वर्ष, रा. काळाफाटा, ता. पारशिवनी, जि. नागपूर हा मिळुन आला. मालकाबाबत विचारपुस केली असता २) अक्षय घाट, रा. नागपूर याचे सांगणेवरून रेतीची चोरटी वाहतुक करीत असल्याचे सांगितले.** पोलीसांनी आरोपी चालकास रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्याकडे कोणताही परवाना नसल्याबाबत माहीती प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष वर नमुद १२ चाकी टिप्पर क्रमांक एम एच—४९/बी झेड—९१६८ **किंमती ३०,००,०००/— रूपये २) ९ ब्रास रेती किंमती ४५,०००/— रूपये असा एकुण ३०,४५,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

**नमुद आरोपी चालक १) अभय शिवराम गोंडाणे, वय २८ वर्ष, रा. काळाफाटा, ता. पारशिवनी, जि. नागपूर २) अक्षय घाट, रा. नागपूर याच्या विरूध्द पोस्टे भिवापूर येथे कलम ३०३(२), ४९, ३(५) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८), महा. जमीन महसुल अधि., कलम ३ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनियम, सहकलम १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे**




## पोलीस स्टेशन रामटेक मर्ग क्रमांक ३३/२०२६ बाबत...

पोलीस स्टेशन रामटेक :— पोलीस स्टेशन रामटेक येथील शितलवाडी येथे दिनांक ०२/०७/२०२६ रोजी मृतक नामे सौरव धर्मा पवार, वय २८ वर्ष रा. शितलवाडी याने गळफास लावून आत्महत्या केली. सदर प्रकरणी पोलीस स्टेशन रामटेक येथे तक्रारदार नामे प्रविण धर्मा पवार रा. उमरेड यांचे तक्रार वरुन मर्ग क्रमांक ३३/२०२६ कलम १९४ भा.ना. सु.सं, २०२३ अन्वये दाखल करण्यात आला आहे.

सदर प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता मा. वरिष्ठ पोलीस अधीक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार यांनी या प्रकरणाची सखोल व निष्पक्ष चौकशी करण्याचे आदेश दिले. त्यानुसार मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात श्री. रमेश बरकते, उपविभागीय पोलीस अधिकारी, रामटेक उपविभाग यांनी स्वत: चौकशीत संबंधित साक्षीदारांची सविस्तर विचारपूस केली तसेच प्रकरणाशी संबंधित साक्षीदारांच्या मोबाईल फोनची तपासणी करून

**उपलब्ध पुराव्यांचेही पाहणी केली. यातील मृतक नामे सौरभ धर्मा पवार वय २८ वर्ष रा. ह. मु. शितलवाडी, रामटेक हे उपविभागीय अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा कार्यालय उपविभाग, रामटेक येथे कनिष्ठ अभियंता या पदावर कार्यरत होते. सदर मर्ग चौकशीत कार्यालयातील सर्व साक्षीदारांचे सविस्तर बयान नोंदविण्यात आले असुन मर्ग चौकशी मध्ये अशी माहीती प्राप्त झाली की, दिनांक १/०७/२०२६ रोजी श्री. रामटेके, उपविभागीय अभियंता (कार्यालय प्रमुख) हे ग्राम पंचायत भंडारबोडी येथील मोजमाप पुस्तिका वर स्वाक्षरी घेण्याकरिता गेले असता मोजमाप पुस्तिकेतील काही कंम्पलेशन प्रमाणपत्र वर कोणीतरी त्यांची बनावट स्वाक्षरी केल्याची दिसून आली. सदर स्वाक्षरी ही श्री. रामटेके यांनी केली नसल्याने त्यांनी याबाबत श्री. पवार यांना माझी स्वाक्षरी कोणी केली याबाबत विचारले असता मृतक पावार यांनी रामटेके यांची बनावट स्वाक्षरी केल्याचे मान्य केले. त्यानंतर श्री. रामटेके यांनी मृतक पवार यांना कारणे दाखवा नोटीस देणे बाबत कार्यालयाला सूचित केले होते.**

**श्री. पवार यांनी श्री. रामटेके यांना फोनद्वारे माफी मागीतल्याचे तांत्रिक पुरावे मिळुन आले. नमुद प्रकरणावरून मृतक नामे सौरभ धर्मा पवार यांनी आत्महत्या केल्याचे प्राथमिक दृष्ट्या दिसुन येत आहे. सदर प्रकरणाची पुढील सखोल चौकशी साक्षीदाराचे मोबाईल जप्त करण्यात आले आहेत. रामटेक पोलीस सदर प्रकरणाची सखोल चौकशी करीत आहेत.**

## अवैधरित्या मुरूमाची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद वाहनासह ०४ लाख ५३ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त वेलतूर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन वेलतूर** :— दिनांक ०७/०७/२०२६ रोजी वेलतूर पोलीस पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या मुरूमाची चोरटी वाहतूक केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी पचखेडी ते तारोली रोड तारोली शिवार येथे नाकाबंदी केली असता ट्रॅक्टर क्र. एम एच —४०/सि एच— ७४३२ सोबत सलग्न असलेली विना क्रमांकाची ट्रॉलीसह मिळून आल्याने वाहन

थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये मुरूम आढळुन आले. **ट्रॅक्टर चालक नामे १) सचिन शामराव चौधरी, वय २७ वर्ष, रा. शिकारपुर, ता. कुही नागपूर हा मिळुन आला.** पोलीसांनी आरोपी चालकास मुरूम वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्याकडे कोणताही परवाना नसल्याबाबत माहीती प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष वर नमुद ट्रॅक्टर क्र. एम एच –४०/सि एच– ७४३२ किंमती ३,५०,०००/–रूपये आणि विना क्रमांकाची ट्रॉली किंमती १,००,०००/–रूपये **२) ०१ ब्रास मुरूम किंमती ३,०००/– रूपये असा एकुण ४,५३,०००/– रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

**नमुद आरोपी १) सचिन शामराव चौधरी, वय २७ वर्ष, रा. शिकारपुर, ता. कुही नागपूर याच्या विरूध्द पोस्टे वेलतूर येथे कलम ३०३(२), ३(५) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८), महा. जमीन महसुल अधि. कलम ४, २१ खाण आणि खनिज अधि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे**

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद.वाहनासह ९७ हजार ५५० रूपयाचा मुद्देमाल जप्त

**पोलीस स्टेशन बेला** :– दिनांक ०७/०७/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथकास गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा सिर्सी येथे काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी पोहचले असता, नमुद घटनास्थळी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना दिसुन आले. पोलीसांनी **आरोपी नामे १) राहुल सुभाष लाडे, वय ३१ वर्ष, रा. सिर्सी, ता. उमरेड, जि. नागुपर ०२) संजय देवराव उरकुडे, वय ४४ वर्ष, रा. वार्ड नं. ०१, सिर्सी ता. उमरेड, जि. नागपुर यांना जागीच पकडले.**

**पोलीसांनी घटनास्थळावरून ५२ तास पत्ते आणि रोख रक्कम ८५६०/–रूपये, ०१ मोपेड मोटरसायकल किंमती ६०,०००/–रूपये, ०२ नग मोबाईल किंमती ३०,०००/–रूपये इतर साहित्य असा एकुण ९७,५५०/– रूपयांचा मुद्देमाल जप्त**

**करण्यात आला आहे. नमुद ०२ आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन बेला येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०५ गुन्हे नोंद

दिनांक ०७/०७/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत पोलीस स्टेशन मौदा, खापा, भिवापूर, उमरेड पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन मोहाफुल दारू असा एकुण १९००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण ०५ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन मौदा** येथे आरोपी नामे आकाश अरून भुरे, वय २८ वर्ष, रा. कोराड याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन खापा** येथे आरोपी १) अंकुश गोमाजी परतेकी, वय ३५ वर्ष, रा. कोरमेटा, ता. सावनेर, जि. नागपुर २) महिला आरोपी यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन भिवापूर** येथे आरोपी नामे परमविर राजन कलसे, वय ३५ वर्ष, रा. मिर्ची मार्केट, वार्ड क्र. २, भिवापूर ता. भिवापूर जि. नागपुर याचे वर १ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन उमरेड** येथे आरोपी नामे विनोद विश्वनाथ धनविजय, वय ५२ वर्ष, रा. कावरापेठ उमरेड याचे वर १ गुन्हा नोंद.

**नमुद कारवाईत एकुण १९ लिटर मोहाफुल दारू असा एकुण १९००/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**